# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 02.06.2025** **वार- सोमवार**

---

**वारीएसटी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात नऊ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर नवीन बसगाड्या दाखल होत आहेत. त्यामुळे यंदाच्या आषाढी वारीच्या काळात पुण्यासह राज्याच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांना नवीन बसगाड्यांमधून सुखद प्रवास अनुभवता येणार आहे. पुणे विभागात ६५ एसटी बसेस नव्याने दाखल झाल्या असून, पुढील महिन्याभरात आणखी बस दाखल होणार आहेत. प्रत्येक आगाराला १० याप्रमाणे बस दिल्या जातील. पुण्यातून पंढरपूरला दर्शनासाठी जाणाऱ्या वारकऱ्यांची संख्या जास्त असते. त्यासाठी महामंडळाचं नियोजन सुरू आहे, असं पुणे विभाग नियंत्रक अरुण सिया यांनी सांगितलं.

**ललितकला**

अखिल भारतीय सांस्कृतिक संघ पुणे आणि युनिस्को यांनी संयुक्तपणे आयोजित केलेला २१वा राष्ट्रीय ललित कला महोत्सव पुण्यात नुकताच उत्साहात पार पडला. या महोत्सवात देशभरातील १८ राज्यातून ४ हजार कलाकार सहभागी झाले होते. भारतीय शास्त्रीय नृत्य, हिंदुस्थानी, कर्नाटकी शास्त्रीय गायन तसंच अनेक प्रकारचे वाद्य वादन असं विविध कलांचं सादरीकरण या महोत्सवात करण्यात आलं. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्हायोलिन वादक पंडित अतुलकुमार उपाध्ये यांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानचिन्ह

आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आलं. राज्यमंत्री माधुरी मिसाळ या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. या महोत्सवातील विजेत्या कलाकारांना थायलंडमध्ये सादरीकरणाची संधी दिली जाणार आहे.

**निकाल**

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कानपूरने आज जेईई ऍडव्हान्स परीक्षेचा निकाल जाहीर केला. result25.jeeadv.ac.in . या संकेतस्थळावर हा निकाल पाहता येईल.

**कोरोना**

राज्यातील कोरोना रुग्णसंख्येत वाढ झाली असून, गेल्या २४ तासांत राज्यात ६५ नवीन रुग्ण आढळले आहेत. त्यात पुण्यात सर्वाधिक २५ रुग्ण असून, मुंबईत २२ कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. राज्यात या वर्षात आतापर्यंत एकंदर ८१४ कोरोना रुग्ण आढळून आले आहेत. यातील ३०० रुग्ण बारे झाले असून ५०६ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. दरम्यान कोरोना रुग्णांमध्ये वाढ होत असल्याने श्वसनविकाराच्या रुग्णांचं सर्वेक्षण करून त्यांची कोरोना चाचणी केली जात आहे. रुग्णांमध्ये सौम्य लक्षणं दिसून येत आहेत; पण नागरिकांनी घाबरू नये, काळजी घ्यावी असं आवाहन पुणे आरोग्य विभागाच्या सहसंचालिका डॉ. बबिता कमलापूरकर यांनी केलं आहे.

**पाणीपट्टी**

राज्याच्या पाटबंधारे विभागाकडून पुणे महापालिकेला मिळणारं पाणी औद्योगिक वापरासाठी घेतलं जात नाही, तरीही १५ टक्के पाणीपट्टी मात्र औद्योगिक दराने आकारली जात आहे. त्यामुळे पाटबंधारे विभागाने महापालिकेच्या पाणी पुरवठ्यावर आकारलेला दीडपट दंड चुकीचा आहे. या देयकांबाबत पुन्हा सुनावणी घ्यावी, तीन महिन्यांच्या आत त्याबाबत निर्णय घ्यावा, असे आदेश जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाने दिले आहेत. त्यामुळे पाटबंधारे विभागाला पुन्हा पाणीपट्टीची देयकं करावी लागणार आहेत.

**<u>चर्चासत्र</u>**

सजग नागरिक मंच आणि पीएमपी प्रवासी मंचातर्फे 'पीएमपीएमएलची प्रवासी भाडेवाढ प्रवाशांसाठी तारक की मारक? या विषयावर काल पुण्यात एका चर्चासत्राचं आयोजन करण्यात आलं होतं. पीएमपीच्या संचालक मंडळावर लोकप्रतिनिधी सदस्य नियुक्त नसताना भाडेवाढीचा निर्णय चुकीचा आणि दुर्दैवी असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी या चर्चासत्रात केला. माजी उपमहापौर डॉक्टर सिद्धार्थ धेंडे, पुणे शहर काँग्रेसचे संजय बालगुडे, भाजपचे प्रवक्ते संदीप खर्डेकर, पीएमपी प्रवासी मंचाचे जुगल राठी आणि विवेक वेलणकर यावेळी उपस्थित होते. इंधनाचे दर, वेतन खर्च यात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने पी एम पी ची झालेली भाडेवाढ नियमानुसार आणि योग्य असल्याचं मत संदीप खर्डेकर यांनी यावेळी व्यक्त केलं.

**<u>वाहतूकपोलिस</u>**

पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पोलिस विभागाने १२५ अत्याधुनिक ध्वनीवर्धक बसवले आहेत. हे ध्वनीवर्धक पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला जोडण्यात आले आहेत. शहरातील मुख्य रस्त्यावरील वाहतुकीचं निरीक्षण सीसीटीव्हीच्या माध्यमातून केलं जाईल; वाहतूक नियोजन करण्यासाठी ध्वनिवर्धकावरून उद्घोषणा केली जाईल असं वाहतूक पोलिसांनी कळवलं आहे. ज्या रस्त्यावर वाहतूक कोंडी जास्त प्रमाणात होते त्याच रस्त्यांवर सध्या या यंत्रणेचा उपयोग केला जाणार आहे. भविष्यात या ध्वनिवर्धकांची संख्या ५००पर्यंत वाढवली जाणार असल्याचं पोलीस विभागानं सांगितलं आहे.

**<u>मराठासमाज</u>**

पिंपरी चिंचवड शहरातील मराठा समाज बांधवांची सहविचार सभा नुकतीच पार पडली. मराठा समाजातील लग्न कार्यात होणारा अफाट खर्च, विविध विधी, यातून निर्माण होणारे अनुचित प्रकार, या सर्व विषयांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. लग्नकार्य आणि विधी थोडक्यात आणि जवळच्या नातेवाईकांमध्ये उरकणं, अंत्यविधी दशक्रिया विधी दरम्यानची भाषणे पूर्णपणे बंद करणं, विवाहापूर्वी

दोन्ही कुटुंबाचं समुपदेशन करणं यासह विविध आचारसंहिता या बैठकीत मंजूर करण्यात आल्या. याला मराठा समाज बांधवांनी संमती दिली.

**<u>हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात आज स्वच्छ सूर्यप्रकाशित वातावरण होतं. आज कमाल ३२ आणि किमान २१ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्याही प्रमुख्यानं कोरडं वातावरण असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये नमस्कार.**